जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 DEC 2017
लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या वतीने भिलार गावाला ग्रंथांची भेट

प्रतिनिधी, कोल्हापूर

**देशातील पहिले** पुस्तकांचे गाव म्हणून महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या भिलार गावाला शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ५१७ ग्रंथ प्रदान करण्यात आले. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि. दा. भिलारे गुरुजी यांची जयंती अशा संयुक्त कार्यक्रमावेळी ही ग्रंथभेट विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथभेट स्वीकारली.

या वेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी देशातील वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने भिलारसारखी पुस्तकांची गावे प्रत्येक जिल्ह्यात निर्माण व्हायला हवीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यानंतर त्यांनी भिलार गावात फिरून तेथील ग्रंथसंग्रहाची पाहणी केली. प्रकल्प समन्वयक धर्माधिकारी यांनी या प्रकल्पांतर्गत भिलारमध्ये सुमारे १५ हजार पुस्तके असून, अनेक घरे वाचकांच्या स्वागतासाठी रात्रंदिवस खुली असतात, अशी माहिती दिली.

यावर डॉ. शिंदे यांनी वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी भिलार येथे राबवलेला पुस्तकांचे गाव हा प्रकल्प स्तुत्य व ऐतिहासिक स्वरूपाचा असल्याचे सांगितले. विद्यापीठातर्फे सध्या प्रातिनिधिक स्वरूपात ५१७ पुस्तकांची देणगी देत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्राचार्य यांनीही काही पुस्तके भेट स्वरूपात दिली आहेत. या वेळी उद्योजक सारंग पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. ता. भोसले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते.

## नागरबाईंचा पुरस्काराने गौरव

स्वतः अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलाला कुलगुरुपदापर्यंत पोहोचविणाऱ्या नागरबाई शिंदे यांना 'मातृ-पितृ पुरस्कार' संभाजीराव पाटणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

3 DEC 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ऑलिम्पिक'-ॲथलेटिक्स निवड चाचणीत २५०० खेळाडूंचा सहभाग

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होऊन देशासाठी पदक मिळविण्याच्या उद्देशाने आयोजित निवड चाचणीत तब्बल २५०० खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारातील १००, २०० व ४०० मीटर धावणे प्रकारासाठी शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. यात कोल्हापूरसह सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले होते.

सन २०२० मध्ये टोकिओ (जपान) येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेच्या दृष्टीने देशभरातील प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्याच्या उद्देशाने आणि त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या दृष्टीने तयार करण्याच्या उद्देशाने नॅशनल युवा सोसायटी (एन.वाय.सी.एस) व गेल इंडियन स्पोर्टस् स्टार यांच्या वतीने या टॅलेंट हंटचे आयोजन करण्यात आले होते. निवड चाचणीची सुरुवात 'गोकुळ'चे संचालक बाबा देसाई व अरुण डोंगळे यांच्या हस्ते झाली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी माणिक वाघमारे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदीवडेकर, विवेक मंद्रुपकर, एन.वाय.सी.ए.चे राज्याचे प्रमुख राजेश पांडे, जिल्हा समन्वयक दीपक शिरगावकर, राजेश आढाव, विभागप्रमुख मंगेश बेंडखळे, प्रा. महेश सूर्यवंशी, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे एस.व्ही. सूर्यवंशी, ज्येष्ठ प्रशिक्षक सुभाष पवार, शंकरराव कुलकर्णी विकास पाटील, यांच्यासह प्रशिक्षक-खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कोल्हापूर : जपान येथे २०२० मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर शनिवारी निवड चाचणी झाली. (छाया : पप्पू अत्तार)**

**अशी असणार निवड प्रकिया...**

११ ते १७ वयोगटातील मुला-मुलींतून १००, २०० व ४०० मीटर धावणे प्रकारासाठी निवड चाचणी होत आहे. जिल्हास्तरावरून निवडलेल्या मुला-मुलींची निवड बालेवाडी (पुणे) येथे होणाऱ्या राज्य निवड चाचणीसाठी होणार आहे. तेथे दोन दिवसांच्या शिबिरासह निवड चाचणी होईल. यातून निवडलेले खेळाडू दिल्ली येथे होणाऱ्या अंतिम राष्ट्रीय चाचणीसाठी पात्र ठरतील. येथे आठ दिवसांच्या शिबिरासह निवड चाचणी होणार आहे. यातून अंतिम ८ ते १० खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

या निवडलेल्या खेळाडूंना २०२० च्या ऑलिम्पिकसाठी तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी संयोजकांची असणार आहे. प्रशिक्षकांसाठी मानधन, क्रीडा साहित्य, पोषक आहार, विविध स्पर्धांसाठी होणारा प्रवास खर्च यासह विविध प्रकारच्या सोयी-सुविधा खेळाडूंना उपलब्ध होणार आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्याची संधी त्यांना मिळणार आहे.

3 DEC 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टोकाची ईर्षा...सळसळता उत्साह

## नॅशनल टॅलेंट हंटला प्रतिसाद : दोन हजारांवर ॲथलेटिक्सपटूंची हजेरी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : गेल इंडियन स्पीड स्टारच्या निवड चाचणीची उत्सुकता... दोन हजारांवर ॲथलेटिक्सपटूंची हजेरी... चाचणी सुरू होताच ईर्षा आणि जिद्दीचे आलेले प्रत्यंतर आणि सळसळत्या उत्साहाने भारवलेले क्षण... अशा वातावरणात नॅशनल युवा को-ऑपरेटिव्ह सोसायटीतर्फे आयोजित नॅशनल टॅलेंट हंटला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर चाचणी झाली.

शालेय व शाळाबाह्य मुलांसाठी ही चाचणी असल्याने ट्रॅकवर सकाळी आठपासूनच ॲथलेटिक्सपटू येत होते. शाहूवाडी, पन्हाळा, चंदगड, गडहिंग्लज, आजरा, राधानगरी, गगनबावडा, शिरोळ, करवीर आदी तालुक्यांसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा जिल्ह्यातील ॲथलेटिक्सपटूंनी चाचणीत सहभाग घेतला. सुमारे सतराशे ॲथलेटिक्सपटूंनी चाचणीसाठी ऑनलाईन नोंदणी केली होती. ११ ते १७ वयोगटातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम होत असल्याने पालक वर्गही ट्रॅकवर हजर होता.

पान २ वर »



कोल्हापूर : नॅशनल युवा को-ऑपरेटिव्ह सोसायटीतर्फे आयोजित ॲथलेटिक्स नॅशनल टॅलेंट हंटच्या निवड चाचणीच्या उद्घाटन प्रसंगी बाबा देसाई, राजेश पांडे, जिल्हा क्रीडाधिकारी माणिक वाघमारे, मंगेश बेंडखळे, प्रा. डॉ. पी. टी. गायकवाड आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 DEC 2017
सकाळ

# टोकाची ईर्षा...सळसळता उत्साह

» पान १ वरून

नॅशनल युवा को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश पांडे, जिल्हा क्रीडाधिकारी माणिक वाघमारे, भाजपचे बाबा देसाई, गोकुळचे अरूणकुमार डोंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत चाचणीस सुरुवात झाली. १००, २०० व ४०० मीटर प्रकारात ही चाचणी झाली. साऊथ इंडियाचे समन्वयक मंगेश बेंडखळे यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक शिरगावकर, संजय जगताप, तुकाराम एंगडे, राजेश आढाव, महादेव सूर्यवंशी, संदीप जाधव, अनिल देसाई, अरूण पाटील, सुधीर मुंज, राहुल मगदूम यांनी चाचणीचे संयोजन केले. निकाल असा : १०० मीटर - १४ वर्षाखालील मुले - प्रतीक आवटी, श्रीधर वाड़कर, राजवर्धन पाटील. १४ वर्षाखालील मुली - प्राजक्ता उडदे, पायल चौगुले, प्रतिक्षा साबळे, मयुरी पाटील, रिया पाटील, धनश्री पाटील, श्वेता माळवे. १३ वर्षाखालील - पूनम पाटील.

२०० मीटर - १४ वर्षाखालील मुले - जगदीश आबिटकर, प्रतीक आवटी, राजवर्धन पाटील, अनिकेत पाटील, श्रीवर्धन पाटील, संदीप राजभट. १४ वर्षाखालील मुली - प्राजक्ता उडदे, श्वेता चिकोडी, सायली पाटील, श्वेता माळवे, समीक्षा पालकर, अनुष्का मोहिते.

४०० मीटर - १४ वर्षाखालील मुली - सानिका गोजकर, पूर्वा शेवाळे. १७ वर्षाखालील मुले - विनायक नलावडे, निरंजन शेटके, रोहन कांबळे, यश येणेकर. १७ वर्षाखालील मुली - वैष्णवी पाटील, रोहिणी पाटील, तितिक्षा पाटोळे.

१०० मीटर - १७ वर्षाखालील मुले - प्रफुल्ल पोवार, अभयसिंह भोसले, अनिकेत शिंदे, दिग्विजय चौगले, पृथ्वीराज चौगुले. १७ वर्षाखालील मुली - रसिका पाटील, ऋतुजा घराळ, रितिका महेकर, मानसी राजमाने.

**११० जिल्ह्यांत चाचणी**

देशातील ११० जिल्ह्यात निवड चाचणी होत आहे. मुंबई शहरात चाचणीचे आयोजन केले होते. कोल्हापुरात झालेल्या चाचणीला ॲथलेटिक्सपटूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सांगली, नाशिक, अकोला, नागपूर, सोलापूर येथे होणाऱ्या चाचणीसाठी ॲथलेटिक्सपटू मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असा विश्वास आहे, असे श्री. बेंडखळे यांनी सांगितले.

**कारभारावरच तोफ**

निवड चाचणी सुरू असताना श्री. पांडे यांच्याकडे सिंथेटिक ट्रॅक ॲथलेटिक्सपटूंना वेळेत उपलब्ध होत नसल्याची तक्रार क्रीडाप्रेमींतून व्यक्त झाली. शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासमोरच ही तक्रार झाल्याने त्यांनी तसे होत नसल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, क्रीडाप्रेमी ऐकण्याच्या तयारीत नव्हते. त्यांनी सरावासाठी ट्रॅक मिळण्याकरिता ॲथलेटिक्सपटूंनी पैसे भरल्याचे सांगत क्रीडा विभागाच्या कारभारावरच तोफ डागली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 DEC 2017
तरुण भारत

# विद्यापीठातील धावण्याच्या शर्यतीत १५०० धावपटूंचा सहभाग

- कोल्हापूरसह रत्नागिरी, सिंधुदुर्गच्या धावपटूंचा समावेश
- यशस्वी धावपटूंची बालेवाडीतील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

लहान मुला-मुलींना ऑलिंपिकसाठी लायक बनविण्याचा उद्देश घेऊन नॅशनल युवा को-ऑप सोसायटीने (एनवायसीएस) शनिवारी राबविलेल्या महत्वाकांक्षी उपक्रमात कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदूर्गातील पंधराशे धावपटूंनी भाग घेतला होता. उपक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर १००, २०० व ४०० मीटर धावणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेतून वेगवान कामगिरी करणाऱ्या ५६ मुला-मुलींची निवड केली.

एनवायसीएसच्या वतीने वरीलप्रमाणे देशातील तब्बल ११० ठिकाणी १००, २०० आणि ४०० मीटर धावणे स्पर्धा होत आहे. लवकरच महाराष्ट्रातील सांगली, पुणे, सोलापूर, नाशिक, बीड, अकोला व नागपूर येथे ही स्पर्धा होणार आहे. मुला-मुलींच्या ११ ते १४ आणि १५ ते १७ या वयोगटांअंतर्गत ही स्पर्धा होईल. स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या धावपटूंना बालेबाडीत जानेवारीमध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडले जाणार आहे. याही स्पर्धेत जे धावपटू चांगली कामगिरी करतील त्यांची फेब्रुवारी २०१८ च्या पहिल्या आठवड्यात दिल्लीमध्ये राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अंतिम स्पर्धेसाठी निवड होईल.

दरम्यान, ११ ते १४ या वयोगटातील मुलांना १०० मीटर धावण्यासाठी १२.६५ सेकंद तर मुलींना १४.६५ सेकंद, २०० मीटर धावण्यासाठी मुलांना २६.४५ सेकंद तर मुलींना २९.६५ सेकंद आणि ४०० मीटर धावण्यासाठी मुलांना ५७ सेकंद आणि मुलींना १ मिनिट ७ सेकंद इतकी वेळ दिली होती.

तसेच १५ ते १७ या वयोगटातील मुलांना १०० मीटर धावण्यासाठी ११.८५ सेकंद आणि मुलींना १४.०५ सेकंद, २०० मीटर धावण्यासाठी मुलांना २४.४० सेकंद तर मुलींना २८.०४ सेकंद आणि ४०० मीटर धावण्यासाठी मुलांना ५४.५० सेकंद आणि मुलींना १ मिनिट ४ सेकंद इतकी वेळ दिली होती.